जा.क्रं. नावाशमनपा/नसका/सिआर-41/2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दिनांक :- 26.12.2017

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समिती सभापती व उपसभापती**
**निवडणूकीसाठी विशेष सभेची सुचना**

शासन अधिसुचना क्रं. बिएनएम/2007/47/प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 मधील नियम 2(1) अन्वये व शासन अधिसुचना क्रं. बिएनएम/2008/295/प्रक्र.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4(1) (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी ठरविल्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या **पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती / उपसभापती पदाच्या निवडणुकीसाठी पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची विशेष सभा दिनांक 30/12/2017 रोजी सकाळी 10.30 वाजता** नावाशमनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखालील (पिठासन अधिकारी) घेण्यात येईल.

सदर सभे मध्ये खालील कामकाज होईल.

## निवडणूक:-

### विषय क्रं. 01:-

महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम 1949 चे कलम 21(1) व शासन अधिसुचना क्रमांक बिएनएम/5007/प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्रमांक बिएलएम/2008/295/प्र.क्र.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4(1) (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) मधील तरतुदीनुसार **पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या निर्वाचीत (11) सदस्यांमधुन पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीची** निवड **करणे.**

### विषय क्रं. 02:-

महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम 1949 चे कलम 21(1) व शासन अधिसुचना क्रमांक बिएनएम/5007/प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्रमांक बिएलएम/2008/295/प्र.क्र.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4(1) (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) मधील तरतुदीनुसार **पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या निर्वाचीत (11) सदस्यांमधुन पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीची निवड करणे.**

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति,
**श्रीमती** -----------------------------------------
**पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समिती**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

कृपया निवडणुक कार्यक्रम मागील पान-----2-------वर पहावे

## निवडणूक कार्यक्रम

**सभापती / उपसभापती पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समिती पदासाठी नामनिर्देशन पत्रे (नॉमिनेशन पेपर) वितरीत करणे व स्विकारणे इत्यादीचे कार्यक्रम पुढील प्रमाणे ठरविलेला आहे.**

| अ.क्र. | तपशिल / विवरण | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 01 | नामनिर्देशन पत्र वितरित करणे | दिनांक 28.12.2017 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यंत नामनिर्देशन पत्र वितरीत करण्यात येईल |
| 03 | नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची तारीख व वेळ | दिनांक 29.12.2017 रोजी एकच दिवस सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजे पर्यंत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येईल. |
| 04 | नामनिर्देशन पत्रे कोणी व कोठे स्विकारावयाचे | नगरसचिव (नगरसचिव कार्यालय) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मुख्य प्रशासकिय इमारतीतील पहिला मजला रुम नं. 118 येथे नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येतील. |
| 05 | नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक 30.12.2017 रोजी विशेष सभा सुरु झाल्यानंतर सभागृहात मा. पीठासीन अधिकारी हे करतील. |
| 06 | उमेदवारी मागे घेणे | दिनांक 30.12.2017 रोजी सभागृहात छाननीनंतर वैध उमेदवाराची नावे मा. पिठासीन अधिकारी यांनी वाचुन दाखविल्यानंतर 15 मिनिटात लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांना देवुन उमेदवारी मागे घेता येईल. |

1) कोरे नामनिर्देशन पत्राचे नमुना (नॉमिनेशन पेपर, नगरसचिव मनपा यांच्या कार्यालयातून वर नमूद तारखेस व वेळत मिळतील )

2) उक्त पदासाठी निवडणुक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या या सोबत जोडलेल्या नमुना-1 मधील आपले नामनिर्देशन, पालिका सचिवाकडे नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करील.

3) प्रत्येक नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पूर्ण नांव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांने सुचक म्हणुन व दुस-याने पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्याने अनुमोदक म्हणुन स्वाक्षरी केलेली असेल.

4) कोणताही पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य एका पेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सुचीत करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही. जर एखादा पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य प्रस्तावक म्हणून किंवा यथास्थिती अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करील तर नगरपालिका सचिवाला प्राप्त झालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता इतर सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील व पिठासीन प्राधिका-याकडून ती नाकारली जातील.

परंतु असे की पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती/ उपसभापती पदाच्या निवडी करिता सुचक किंवा अनुमोदक असणा-या पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यास त्या पदासाठी निवडणुक लढविता येणार नाही.

5) बोलाविण्यात आलेली पुर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची विशेष बैठक रद्द किंवा तहकुब करता येणार नाही.

6) उमेदवाराचे सुचक किंवा अनुमोदक यांना, उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणा-या कोणत्याही व्यक्तीस, ती नोटीस रद्द करण्याची परवानगी नसेल.

**स्वाक्षरीत/-**

**नगरसचिव,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड